## नि.क.६३ खालील आदेश
(दि.०२/०७/२०१९)

वादींनी अतिरीक्त मुद्दे काढण्याकरीता सदरचा अर्ज सादर केला आहे. वादींचे वकील श्री.व्ही.एस.शेळके यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांनी त्यांचा लेखी जबाब निशाणी क्रं.५८ यात प्रतिवादी क्रं.१ ते ५ हे सन १९८८ सालातील फेरफार क्रं.३५६ अन्वये वाद जमीनीचे मालक व ताबेदार असल्याबाबत कथन केले आहे. वादी क्रं.१ आणि प्रतिवादी क्रं.१ व ६ हे सख्खे भाऊ आहेत. प्रतिवादी क्रं.२ ते ५ हे प्रतिवादी क्रं.१ च्या कुटूंबातील व्यक्ती आहेत. वादी क्रं.१ आणि प्रतिवादी क्रं.१ व ६ यांच्या वडीलोपार्जित मालमत्तेत कोणत्याही वाटण्या झाल्या नाहीत. वादातील मालमत्ता ही मयत अंतराम ढेपे यांच्या मालकी व ताब्यात होती. हिराबाई ढेपे आणि अंतराम ढेपे हे वादी क्रं.१ आणि प्रतिवादी क्रं.१ व ६ यांचे आई-वडील असल्यामुळे वादी क्रं.२ ते ४ आणि प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांना वादातील शेतजमीनीचे कायदेशीर वारस म्हणुन हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, सन १९८४ साली झालेला फेरफार क्रं.२७४ आणि सन १९८८ साली झालेला फेरफार क्रं.३५६ हे बेकायदेशीर असुन खोटे आहेत. निशाणी क्रं.६२ अन्वये न्यायालयाने मुद्दे निश्चित केले आहे. परंतू, वरील उपस्थित केलेल्या बाबींवर मुद्दे निश्चित करण्यात आलेले नाहीत. तरी, अर्जाच्या परिच्छेद क्रं.६ यात नमुद केलेले प्रस्तावित चार मुद्दे हे निश्चित करावे ज्यामुळे न्यायालयासमक्ष वस्तुस्थिती ही पुराव्याच्या आधारे समोर येईल. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजुर करून अतिरिक्त मुद्दे निश्चित करण्यात यावे.

२) प्रतिवादी क्रं.१ ते ५ तर्फे श्री.बी.एन.पौळ वकिलांनी असा युक्तिवाद केला की, वादींनी सदरचा अर्ज हा सदरचा दावा लांबविण्याकरीता दाखल केला आहे. सदरील

न्यायालयाने निशाणी कं.६२ अन्वये जे मुद्दे निश्चित केलेले आहेत त्यात वादींनी मागणी केलेले प्रस्तावित अतिरिक्त मुद्दे हे समाविष्ट होतात. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, वादी कं.१ आणि प्रतिवादी कं.१ व ६ यांच्या वडीलोपार्जित मालमत्तेसंबंधी वाटण्या झालेल्या नाहीत ही बाब खोटी आहे. वादातील मालमत्ता ही अंतराम ढेपे आणि हिराबाई ढेपे यांच्या मालकी व ताब्यात होती ही बाब चुकिची आहे. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, जी तोंडी वाटणी सन १९८८ मध्ये दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी झाली होती त्या वाटणीच्या अनुशंगाने दस्तावेज तयार करण्यात आला होता आणि त्या दस्तावेजाच्या अनुशंगाने फेरफार कं.३५६ देण्यात आला होता. त्यामुळे तो फेरफार बेकायदेशीर व बनावटी नाही. वादींनी परिच्छेद कं.६ मध्ये जो प्रस्तावित मुद्दा कं.१ दर्शविलेला आहे तो मुद्दा निशाणी कं.६२ यावर काढलेला मुद्दा कं.१ यात समाविष्ट होतो. तसेच, प्रस्तावित मुद्दा कं.२ ते ४ हे दाव्याशी निगडीत नसल्यामुळे ते ग्राहय धरण्यात येऊ नये. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, सदरचा अर्ज खारीज करण्यात यावा.

३) सदरचे प्रकरण हे घोषणा व कायमचे मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. तसेच, वादींनी वाटणी, वेगळा ताबा व रक्कम परत मिळण्याकरीता पर्यायी मागणी केली आहे. प्रतिवादी कं.१ ते ५ यांचा लेखी जबाब निशाणी कं.५८ चे अवलोकन केले असता त्यातील परिच्छेद कं.१० मधील उप-परिच्छेद यात सन १९८८ च्या दिवाळीच्या पाडव्याला प्रत्यक्षात संयुक्त कुटूंबाच्या मालमत्तेच्या तोंडी वाटण्या झाल्या होत्या आणि त्या अनुशंगाने वाटणीचा मेमो तयार करण्यात आला होता. सदरच्या वाटणी मेमो अन्वये फेरफार कं.३५६ घेण्यात आला आहे. परंतू, तोंडी वाटण्याच्या मेमोच्या अनुशंगाने नंतर फेरफार कं.३५६ घेण्यात आला होता ही बाब सध्याच्या स्थितीत पुराव्याअभावी निकाली काढता येणार नाही. तसेच, फेरफार कं.२७४ आणि ३५६ अन्वये प्रतिवादी कं.२ ते ५ हे मालक झाले आहेत ही बाब सुध्दा सध्याच्या स्थितीत पुराव्याअभावी निकाली काढता येणार नाही. त्यामुळे सदरच्या मुद्दयांवर अतिरिक्त मुद्दे निश्चित केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील असलेला मूळ वाद हा पुराव्याच्या आधारे न्यायालयासमक्ष येईल व सदरचा दावा हा निकाली काढताना न्यायालयास मदत होईल. त्यामुळे मी खालील प्रमाणे

आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२) अतिरिक्त मुद्दे हे निशाणी क्रं.६२ यावर निश्चित करण्यात येतात.

अहमदपूर.
दिनांक : ०२/०७/२०१९.

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
अहमदपूर

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

Name of Stenographer : A.S.Kodgire
Dictated on : 02.07.2019
Checked on : 02.07.2019
Signed on : 02.07.2019
Uploaded on : 03.07.2019